# प्रेसनोट दि. १६/०८/२०१९

## गांजा विक्रीसाठी आलेल्या आरोपीस ४ किलो गांजासह युनिट-१ गुन्हे शाखा यांचेकडून पुण्यात अटक

-----ooo-----------ooo-----------ooo-----------ooo-----

दि.१२/०८/२०१९ रोजी युनिट-१, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडील अधिकारी व स्टाफ बकरी ईद निमीत्त पुणे शहराचे हद्दीत वरीष्ठांचे आदेशाने अंमली पदार्थाचे गैरव्यवहाराचे अनुषंगाने माहिती काढणे करीता पेट्रोलिंग करीत असताना पोलीस नाईक सचिन जाधव यांना त्यांचे बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की बजाज अलायंन्स कंपनीच्या आऊट गेट समोर सार्वजनिक मुतारी जवळ येरवडा, पुणे येथे एक इसम त्याची लाल काळया रंगाची बजाज पल्सर मोटारस सायकल वर असून त्याचे हातामध्ये एक काळया निळया रंगाची हँडबँग मध्ये गांजा घेवुन उभा आहे.

अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्या बाबत वरिष्ठांना माहिती कळविली असता वरिष्ठांच्या परवानगीने युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर पथकाकडील स्टाफसह बातमी प्रमाणे जावुन नमुद आरोपीस ताब्यात घेतले असून त्याचे नांव पत्ता आकाश अण्णा माने, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण, रा. मु.पो. कानगांव, ता. दौंड, जिल्हा, पुणे असे आहे. त्याचे जवळ असलेल्या काळया निळया रंगाची हँडबँगची झडती घेतली असता त्यामध्ये पिवळसर रंगाच्या प्लॅस्टीकच्या पॅकींगमध्ये बिया-बोंडासह हिरवट-काळसर रंगाचा ओलसर गांजा ज्याचे एकुण वजन ०४ किलो ६४ ग्रॅम वजनाचा कि.रु. ८०,०००/- तसेच एक बजाज पल्सर मोटार सायकल असा कि.रु. ७०,०००/- असा एकुण १,५०,०००/- रु किं चा माल जप्त करुन त्याचे विरुध्द येरवडा पोलीस स्टेशन येथ गु.र.नं. ५६६/२०१९ एन. डी. पी. एस. अॅक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपी व जप्त मुद्देमाल पुढिल तपासा करिता येरवडा पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री बच्चन सिंह, यांचे मार्गदशनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पोलीस उपनिरीक्षक हनुमंत शिंदे, पो. उप. निरी. दिनेश पाटील, पो.उप.निरी. उत्तम बुदगुडे, पोलीस कर्मचारी सचिन जाधव, तुषार माळवदकर, सुभाष पिंगळे, प्रकाश लोखंडे, कैलास गिरी, उमेश काटे, अनिल घाडगे, योगेश जगताप, सुधाकर माने, अजय थोरात, मल्लीकार्जून स्वामी, अमोल पवार, संजय बरकडे, श्रीकांत वाघवले, इम्रान शेख, तुषार खडके, अशोक माने, विजेसींग वसावे, यांनी केली आहे.

वरीष्ठ पोलीस निरीक्षक
युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर